**निशाणी क्र.३२**

**<u>अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.७.</u>**

मी शपथेवर निवेदन करतो की,

| | | | |
|---|---|---|---|
| माझे नांव | : महादेव गोवर्धन महाजन | | |
| माझे वय | : ५९ वर्षे | व्यवसाय | : शेती |
| राहणार | : बरमाचीवाडी | तालुका | : कळंब |
| जिल्हा | : धाराशिव. | | |

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा.सरकारी अभियोक्ता श्री. अयाजोद्दीन रियाजोद्दीन यांचेमार्फत शपथेवर सुरु -</u>**

१. सन २०२३ मध्ये मी बरमाचीवाडी येथे राहत होतो. मी शेती करत होतो. पोलीसांनी दिनांक १९/०४/२०२३ रोजी ११.४५ वा. सुमारास मला बरमाचीवाडीच्या बाहेर एक किलोमीटर अंतरावर वाघोली रोडवर पंचनाम्याकामी बोलावले होते. पोलीसांनी माझ्यासमक्ष कपडे जप्त केले. त्याबद्दल पोलीसांनी माझ्यासमक्ष दोन पंचनामे केले. आता मला अभिलेखावरील ते पंचनामे दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास अनुक्रमे **<u>निशाणी ३३ आणि ३४</u>** देण्यात आले.

२. आता मला घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेला पांढ-या रंगाचा हाफ भायाचा शर्ट, काळ्या रंगाचे फुल पॅंट, गडद निळ्या रंगाचा टी-शर्ट, एक निळ्या रंगाची जिन्स पॅंट दाखविण्यात आले. ते तेच आहेत. त्यांना अनुक्रमे वस्तु **<u>झ/१ ते झ/४</u>** देण्यात आले.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.व्ही. कवडे यांच्यामार्फत-</u>**

३. फिर्यादी माझा चुलत भाऊ आहे तर समर्थ माझा पुतण्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२३ मध्ये माझी पत्नी ग्रामपंचायत सदस्य होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तिला उपसरपंच पदासाठी उभे केले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी वैभव हा त्यावेळी ग्रापंचायतचा सदस्य होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी

वैभव ने माझ्या पत्नीच्या विराधोत मतदान केल्यामुळे माझा त्याच्याविरुध्द राग होता. हे म्हणणे खरे नाही की, बाबासाहेब यांच्या सांगण्यावरुन मी पंचनाम्यावर सही केली. पंचनाम्याच्या वेळी फिर्यादी बाबासाहेब तेथे नव्हता. समर्थ होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९/०४/२०२३ रोजी पोलीसांनी पंचनाम्याकामी बोलावले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा चुलत भाऊ आणि समर्थ हा पुतण्या असल्यामुळे त्यांना मदत व्हावी म्हणुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

NITIN MAHADEO REDDY

Digitally signed by NITIN MAHADEO REDDY
Date: 2026.06.17 16:38:33 +0530

दिनांक :- १७/०६/२०२६.

**( एन. एम. रेड्डी)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कळंब.
(कोर्ट क्र.२)